# चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी




## ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

१९६२–२०१२

Jnana Prabodhini Golden Jubilee 1962 - 2012

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

५०

ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

© ज्ञान प्रबोधिनी

प्रकाशक : कार्यवाह,
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मूल्य : ₹ ७५/-

प्रधान कार्यालय – ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०.
दूरभाष क्र. (०२०) २४२०७०००
e-mail: contact@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी

## 'समाज संस्थापनेसाठी नेतृत्व विकसन'





## संशोधन

- विविध सामाजिक व आर्थिक स्तरातील बुद्धिमत्तेच्या १२० पैलूंचा शोध व मापन
- प्रेरणा, प्रतिभा, गतिवाचन निर्णयक्षमता तसेच सामाजिक जाणीव व गटकार्य यावर संशोधन
- भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावावर संशोधन



## शिक्षण

- 'मनुष्य घडणीचे शिक्षण' या स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेचा क्रमिक शिक्षणाशी जोडलेला पथदर्शक प्रयोग
- अनौपचारिक शिक्षणाची समाजाभिमुख चळवळ
- गुरुकुल पद्धतीचे शहरात व ग्रामीण परिसरात प्रयोग

## विकास

- देशप्रश्नांच्या सोडवणुकीसाठी चारित्र्य व सक्षम नेतृत्वाची जडणघडण
- स्त्री शक्ती प्रबोधन
- नदीचे खोरे हा घटक मानून ग्रामीण विकासाचे बहुविध उपक्रम





## एकात्मता

- निवडक संस्कारविधींना कालोचित व सार्थ रूप देणाऱ्या पुस्तकांचे प्रकाशन
- सर्व जातीधर्मातील स्त्री-पुरुषांना पौराहित्याचे प्रशिक्षण
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी विभिन्न विचारसणींमध्ये पूल बांधण्याचे प्रयत्न.

## आरोग्य

- रोगप्रतिबंधक उपायांची जाणीवजागृती
- क्रीडाकुल संकल्पनेद्वारा स्पर्धात्मक खेळांचा प्रसार
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व जिव्हाळ्याचे मानवी संबंध यांवर आधारित रुग्णालये
- आयुर्वेद, योग, मानसोपचार इ. चा एकात्मिक वापर



केंद्र - पुणे, निगडी, सोलापूर, हराळी उपकेंद्र - शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे, शिरवळ,
विस्तारकेंद्र - डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, सांगली
प्रधान कार्यालय - ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०. दूरभाष क्र. (०२०) २४२०७०००
e-mail: contact@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

१९६२-२०१२

# ज्ञान प्रबोधिनी

**भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक ध्यासपीठ !**

**स्वामी विवेकानंदांनी मांडलेली कल्पना - मनुष्यघडणीच शिक्षण !**

ते आजच्या काळात प्रत्यक्षात कसे येईल, याची एका स्वप्नवेडया संघटकाने केलेली एकात्म, तरीही व्यापक अन् विस्तारशील मांडणी.

डॉ. वि. वि. तथा आप्पासाहेब पेंडसे यांनी १९६२ मध्ये स्थापन केलेली 'ज्ञान प्रबोधिनी' ही शिक्षणसंस्था 'रूप पालटू देशाचे!' असे आपले उद्दिष्ट मानते.

देशापुढील विविध प्रश्न सोडविणे हे आपले जीवनध्येय असले पाहिजे, असे वाटणारे शेकडो युवक-युवती प्रबोधिनीच्या मांडणीतून नित्य घडावेत या हेतूने गेल्या ५० वर्षांत झालेला हा कार्यविस्तार.

शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, स्त्री शक्ती प्रबोधन, प्रशासन, उद्योजकता प्रशिक्षण, आरोग्य आणि राष्ट्रीय एकात्मता अशा विविध क्षेत्रांमध्ये पुढाकार घेऊन नेतृत्व करू शकतील असे प्रेरणासंपन्न व चारित्र्यशील कार्यकर्ते निर्माण व्हावेत, यासाठी प्रबोधिनी कटिबद्ध आहे.

अध्यात्म आणि ईशचिंतन यात नित्यनूतन, शास्त्रे व तंत्रज्ञान यात अद्ययावत व आधुनिक असा समाज निर्माण होण्यासाठी प्रबोधिनीचे शिक्षण आहे.

सर्व वयोगटांसाठी, सर्व जातिधर्मांमध्ये सलोख्याचे पूल बांधणारे, विविध विचारसरणींचा आदर करीत व्यापक हिंदुत्व म्हणजेच भारतीयत्व, प्रत्यक्ष आचरणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच म्हणजेच ज्ञान प्रबोधिनी.

मनुष्यघडणीच्या माध्यमातून समाज संस्थापनेची ही प्रक्रिया कशी घडू शकेल, या ध्येयाने झपाटून विविध क्षेत्रात केलेले हे अभिनव शैक्षणिक प्रयोग चित्ररूपाने ...

प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत
स्वामी विवेकानंदांना त्यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त सादर समर्पण !

सौर २२ पौष, शके १९३४ — १२ जानेवारी २०१३

# ज्ञान प्रबोधिनी



ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे



ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे



मातृमंदिर, ज्ञान प्रबोधिनी, निगडी



ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी



ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर सोलापूर



ज्ञान प्रबोधिनी हराळी